# संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांचे कार्यालय

मु.पो.ता.वैराट रोड, चिखलदरा ता.चिखलदरा जि.अमरावती पिन-444 807

ई-मेल-principal.mfrc933@gmail.com फोन नं.07220-230230


क्रमांक:कक्ष:-03/सं.व.प्र.सं.चि./शिलि/ 810 /2025-26 चिखलदरा 444 807, दिनांक:- 16/12/2025

प्रति,

उप वनसंरक्षक,
( शिक्षण व प्रशिक्षण )
म.रा.पुणे.

**विषय**:- माहे आक्टोबर 2025 ची वन शैक्षणिक वार्ता सादर करणे बाबत.

**संदर्भ**:- आपले कार्यालयीन पत्र क्रमांक : कक्ष-1/प्रशिक्षण/187/2025-26 दिनांक 25/06/2025.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील सरळ सेवा प्रविष्ठ नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्रमांक 63 मधील प्रशिक्षणार्थींचे व वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले राज्य योजने अंतर्गत वनरक्षक / वनपाल व लिपीक / लेखापाल यांचे 03 व 05 दिवसीय अल्प मुदत प्रशिक्षणामधील प्रशिक्षणार्थीचे कार्यक्रम संबंधाने सुरु असलेल्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमाचा दिनांक **01/10/2025** ते **31/10/2025** पर्यंतचा मासीक शैक्षणीक अहवाल सोबत सहपत्रीत करुन अवलोकनार्थ व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

**सहपत्र**:- वरील प्रमाणे. ( पेज क्र. 1 ते 39 )

( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )
संचालक,
वन प्रशिक्षण संस्था,चिखलदरा.

**प्रतिलिपी** :- मा. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण) म.रा.चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.

( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )
संचालक,
वन प्रशिक्षण संस्था,चिखलदरा.

Scanned with OKEN Scanner

# * प्रस्तावना *

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा ही महाराष्ट्र राज्यातील वन विभागाच्या प्रशिक्षण क्षेत्रातील एक **अग्रगण्य व मान्यताप्राप्त** संस्था आहे. संस्थेमार्फत नव नियुक्त व कार्यरत वन कर्मचाऱ्यांना **गुणवत्तापूर्ण** आणि **शिस्तबध्द** प्रशिक्षण प्रदान करण्याचे कार्य सातत्याने करण्यात येते.

**दिनांक** 01/10/2025 पासुन संस्थेमध्ये सरळ सेवा नव नियुक्त अप्रशिक्षित **वनरक्षक** प्रशिक्षणार्थी **तुकडी क्र**. 63 यांचे सहा महिन्याचे **निवासी प्रशिक्षण** सुरु करण्यात आले आहे. यासोबतच, **राज्य योजने** अंतर्गत **वनरक्षक / वनपाल व लिपीक / लेखापाल** यांचे **5 दिवसीय व 3 दिवसीय अल्प मुदत** प्रशिक्षण (प्रशिक्षण कालावधी दि. 06/10/2025 ते 18/10/2025) या कालावधीमध्ये **एकुण 06 सत्रांमध्ये** आयोजीत करण्यात आले.

**दिनांक** 01/10/2025 **ते** 31/10/2025 या कालावधीत, संस्थेच्या **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** यांच्या सक्षम नेतृत्व व मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थींसाठी विविध शैक्षणिक, प्रात्यक्षिक, कौशल्यविकास व वनसंवर्धनास पूरक उपक्रम राबविण्यात आले. प्रशिक्षणाच्या गुणवत्तेस चालना देणारे आणि प्रशिक्षणार्थींचा सर्वांगीण विकासास हातभार लावणारे हे उपक्रम नियोजित व शिस्तबध्द पध्दतीने पार पडले.

सदर मासिक शैक्षणिक अहवालामध्ये दिनांक **01/10/2025 ते 31/10/2025** या कालावधीत राबविण्यात आलेल्या प्रशिक्षण उपक्रमांचा संक्षिप्त आढावा देण्यात आलेला आहे.

या अहवालाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे प्रशिक्षण कार्यक्रमातील विविध शैक्षणिक व प्रात्यक्षिक घटकांची स्पष्ट, शिस्तबध्द आणि कालानुक्रमिक नोंद सादर करणे. या माध्यमातून संस्थेतील प्रशिक्षणाची कार्यपध्दती, प्रशिक्षणार्थींची प्रगती, सत्रांची परिणामकारकता, तसेच एकंदर शैक्षणिक वातावरण यांचा समावेश असलेली संपूर्ण माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवणे अपेक्षित आहे.

हा अहवाल पुढील प्रशिक्षण सत्रांच्या नियोजनासाठी मार्गदर्शक ठरणारा असून, प्रशिक्षणाच्या गुणवत्ता नियंत्रणात तसेच धोरणात्मक निर्णय प्रक्रियेस सहाय्यक ठरेल. संस्थेमध्ये सुरु असलेल्या प्रशिक्षण उपक्रमांची पारदर्शक, संक्षिप्त व विश्लेषणात्मक माहिती या अहवालाच्या माध्यमातून प्रस्तुत करण्यात आलेली आहे.

# * अनुक्रमणिका *


| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | पेज नं. |
|---|---|---|
| 01 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांची तोंडओळख व संपुर्ण माहिती. ( दि. 01/10/2025 ) | 3 ते 5 |
| 02 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 प्रथम सत्र अभ्यासक्रम ( दि. 01/10/2025 ते 07/12/2025 ) | 6 ते 9 |
| 03 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांना Forest & Forestry या विषयावर प्रशिक्षण. | 10-11 |
| 04 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांना Wildlife Forensic Sample Collection and Dispatch या विषयावर प्रशिक्षण दि. 03/10/2025 | 12 |
| 05 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे संस्थेतील क्षेत्रीय कामे. ( कालावधी दि. 01/10/25 ते 31/10/2025) | 13 |
| 06 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ ( कालावधी दि. 01/10/25 ते 31/10/2025) | 14 ते 17 |
| 07 | महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती. ( दि. 02/10/2025 ) | 18 |
| 08 | महर्षी वाल्मिकी यांची जयंती. ( दि. 07/10/2025 ) | 19 |
| 09 | वन्यजीव सप्ताहा निमित्त रक्तदान शिबीर ( दि. 07/10/2025 ) | 20 |
| 10 | **M-STrIPES** हाताळणी बाबत प्रशिक्षण. ( दि. 14/10/2025 ) | 21 ते 22 |
| 11 | डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती. ( दि. 15/10/2025 ) | 23 |
| 12 | मा. उप वनसंरक्षक ( शिक्षण व प्रशिक्षण ) म.रा. पुणे यांचा दौरा. ( दि. 28/10/2025 ते 29/10/2025 ) | 24 ते 28 |
| 13 | सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व इंदिरा गांधी पुण्यतिथी. ( दि. 31/10/2025 ) | 29 |
| 14 | राज्य योजने अंतर्गत लिपीक / लेखापाल / वनरक्षक / वनपाल यांचे 03 व 05 दिवसीय अल्प मुदत प्रशिक्षण कार्यक्रम (एकुण 06 सत्र माहे आक्टोबर 2025) | 30 ते 37 |
| 15 | वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या नवीन बोधचिन्हाचे अनावरण तसेच संस्थेची वेबसाईट व युट्युब चॅनेलची निर्मिती. | 38 ते 39 |
| | | |

## 01.**वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र.** 63 **यांची तोंडओळख व संपुर्ण माहिती**.

**( दि.** 01/10/2025 **)**

नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचे वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सहा महिन्यांचा मूलभूत निवासी प्रशिक्षणाचा प्रारंभ दि. **01 ऑक्टोबर 2025** पासुन सरु झाला असुन प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी सर्व प्रशिक्षणार्थींची **तोंडओळख** घेण्यात आली तसेच प्रत्येक प्रशिक्षणार्थींची व्यक्तिगत माहिती, शैक्षणिक पात्रता, नियुक्तीचे तपशील, तसेच शारीरिक व मानसिक तयारी यांची नोंद करण्यात आली.

या तोंडओळख सत्राचा उद्देश प्रशिक्षणार्थींच्या पार्श्वभूमीची माहिती मिळवणे, संस्थेच्या प्रशिक्षण नियमावलीची ओळख करुन देणे, तसेच येणाऱ्या सहा महिन्यांच्या वन प्रशिक्षण कार्यक्रमाचा स्वरुप, उद्दिष्टे आणि अपेक्षा याबाबत प्रशिक्षणार्थींना प्राथमिक मार्गदर्शन करणे हा होता.

प्रशिक्षणाच्या सुरळीत व शिस्तबध्द अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या सर्व सूचनांची माहिती प्रशिक्षणार्थींना देण्यात आली असून पुढील कालावधीत वनसंवर्धन, वनरक्षण, कायदे, नकाशे, शस्त्र प्रशिक्षण, पेट्रोलिंग आदी विविध विषयांवर सखोल प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

सदर तोंडओळख सत्र वन प्रशिक्षण संस्थेचे **संचालक**, यांनी स्वत: उपस्थित राहून पार पाडले व प्रशिक्षणार्थींना आवश्यक प्राथमिक सूचना व मार्गदर्शन प्रदान केले.

| **अ.क्र.** | **वनवृत्त** | **वाटप संख्या** | | **हजर संख्या** | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **पुरुष** | **स्त्री** | **पुरुष** | **स्त्री** | **एकुण** |
| **01** | कोल्हापूर | 13 | **00** | 10 | 00 | 10 |
| **02** | नाशिक | 03 | **00** | 02 | 00 | **02** |
| **03** | धूळे | 14 | 20 | 09 | 16 | 25 |
| **04** | ठाणे | 10 | **00** | 10 | 00 | 10 |
| | **एकुण** | **40** | **20** | **31** | **16** | **47** |

**अप्रशिक्षित वनरक्षकांचे 6 महिने कालावधीचे प्रशिक्षण सत्र क्रमांक** 63

**कालावधी दिनांक** 01/10/2025 **ते** 29/03/2025.

**उपस्थित प्रशिक्षणार्थींची यादी**

| **अ.क्र.** | **वनरक्षक प्रशिक्षणार्थींचे नांव** | **रुजु दिनांक** | **वनविभाग** | **वनवृत्त** |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. डबरसिंग पेरकीबाई भायला पावरा | 30/09/2025 | नंदुरबार | धुळे |
| 2 | श्री. आकाश मकीबाई फोपा पावरा | 30/09/2025 | नंदुरबार | धुळे |
| 3 | कु. प्रियंका सुशिलाबाई देवसिंग भंडारी | 30/09/2025 | नंदुरबार | धुळे |
| 4 | कु. सविता वसीबाई फोप-या पावरा | 30/09/2025 | नंदुरबार | धुळे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | कु. निशा मधुमती भरतसिंग वळवी | 30/09/2025 | नंदुरबार | धुळे |
| 6 | कु. सुनिता शकीलाबाई गण्या वळवी | 30/09/2025 | नंदुरबार | धुळे |
| 7 | कु. प्रियंका मानीबाई दिलवरसिंग पावरा | 30/09/2025 | नंदुरबार | धुळे |
| 8 | कु. प्रियंका प्रमिला हरिचंद्र गावीत | 30/09/2025 | नंदुरबार | धुळे |
| 9 | कु. अरुणा काथुडीबाई फत्तु पाडवी | 30/09/2025 | मेवासी वनविभाग,तळोदा | धुळे |
| 10 | कु. निताली कुंदाबाई कांतीलाल गावीत | 30/09/2025 | नंदुरबार | धुळे |
| 11 | कु. सपना जेवंतीबाई दामा वसावे | 30/09/2025 | मेवासी वनविभाग,तळोदा | धुळे |
| 12 | कु. कुंदा मानिबाई राज्या वळवी | 30/09/2025 | मेवासी वनविभाग,तळोदा | धुळे |
| 13 | कु. विजया खारकीबाई पोहल्या वसावे | 30/09/2025 | मेवासी वनविभाग,तळोदा | धुळे |
| 14 | श्री. अभिजित सरस्वती विष्णू कार्ले | 30/09/2025 | अलिबाग | ठाणे |
| 15 | श्री. लखन जिजाबाई रतन रहाडे | 30/09/2025 | ठाणे | ठाणे |
| 16 | श्री. अजय सगुणा संतोष मलाव | 30/09/2025 | अलिबाग | ठाणे |
| 17 | श्री. जितेंद्र मंगल संपतराव महाडीक | 30/09/2025 | अलिबाग | ठाणे |
| 18 | श्री. अविकांत कुसूम बाळासाहेब साळुंखे | 30/09/2025 | अलिबाग | ठाणे |
| 19 | श्री. बापु नंदा उत्तम येवले | 01/10/2025 | ठाणे | ठाणे |
| 20 | श्री. साहिल दिपाली उमेश थोरात | 01/10/2025 | रायगड | ठाणे |
| 21 | श्री. अल्पेश सुनंदा गंगाधरराव वाटाने | 01/10/2025 | ठाणे | ठाणे |
| 22 | श्री. विकास शांता शाम पाटील | 01/10/2025 | ठाणे | ठाणे |
| 23 | श्री. विकास गुलाब गणपत उमतोल | 01/10/2025 | ठाणे | ठाणे |
| 24 | कु. अनिसा शरीफा अय्युब तडवी | 01/10/2025 | नाशिक वन्यजीव | धुळे |
| 25 | कु. अश्विनी जुंगताबाई कैलास पावरा | 01/10/2025 | नाशिक वन्यजीव | धुळे |
| 26 | श्री. आकाश विमल तुकाराम चौधरी | 01/10/2025 | पश्चिम भाग नाशिक | नाशिक |
| 27 | श्री. अमोल सुनंदा हिरालाल पाटील | 02/10/2025 | पश्चिम भाग नाशिक | नाशिक |
| 28 | श्री. राहुल निर्मलाबाई रामदास बहिरम | 03/10/2025 | धुळे | धुळे |
| 29 | श्री. दानिल जेठीबाई रामा मावची | 03/10/2025 | धुळे | धुळे |
| 30 | श्री. सचिन मालतीबाई अभिमन्यु चौरे | 03/10/2025 | धुळे | धुळे |
| 31 | कु. विजया शेवंतीबाई शिवाजी वळवी | 03/10/2025 | धुळे | धुळे |
| 32 | कु. वनिता वसंती देविदास गवळी | 03/10/2025 | धुळे | धुळे |
| 33 | श्री. महारु तोलाबाई रमता देसाई | 03/10/2025 | धुळे | धुळे |
| 34 | श्री. रविंद्र बाटीबाई गटरसिंग पावरा | 03/10/2025 | धुळे | धुळे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **35** | श्री. मधुकर भिमाबाई शामराव चौरे | 03/10/2025 | धुळे | धुळे |
| **36** | श्री. मनिष ललिता उत्तम देशमुख | 03/10/2025 | धुळे | धुळे |
| **37** | श्री. श्रेयश रेखा श्यामसुंदर रायके | 05/10/2025 | कोल्हापूर | कोल्हापूर |
| **38** | कु. स्विटी हेमवती वाण्या कुवर | 05/10/2025 | धुळे | धुळे |
| 39 | श्री. बसवराज मलम्मा संगापा बालगांव | 08/10/2025 | सावंतवाडी (प्रा.) | कोल्हापूर |
| **40** | श्री बाबुराव राणाबाई काशिनाथ अढळ | 09/10/2025 | कोल्हापूर (प्रा.) | कोल्हापूर |
| **41** | श्री गणेश विशाखा विक्रम कदम | 09/10/2025 | कोल्हापूर (प्रा.) | कोल्हापूर |
| 42 | श्री संतोष बाळाबाई बाळु पाटील | 10/10/2025 | सातारा (प्रा.) | कोल्हापूर |
| **43** | श्री सचिन सविता ईश्वर पवार | 10/10/2025 | सावंतवाडी (प्रा.) | कोल्हापूर |
| **44** | श्री सुयश कमल प्रकाश पाटील | 10/10/2025 | सावंतवाडी (प्रा.) | कोल्हापूर |
| 45 | श्री शहाजी अनंदी वसंत खाडे | 10/10/2025 | सावंतवाडी (प्रा.) | कोल्हापूर |
| **46** | श्री स्वप्निल मालती चंद्रकांत भोपळे | 10/10/2025 | सातारा (प्रा.) | कोल्हापूर |
| **47** | श्री सुरेश रत्नमाला गणेशराव घोरपडे | 10/10/2025 | सावंतवाडी (प्रा.) | कोल्हापूर |

02. नव नियुक्त अप्रशिक्षीत वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 प्रथम सत्र अभ्यासक्रम. ( दि. 01/10/2025 ते 07/12/2025 )









**वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 प्रथम सत्र अभ्यासक्रम**. ( दि. 01/10/2025 **ते** 07/12/2025 )

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे **दि**. 01/10/2025 पासुन नव नियुक्त अप्रशिक्षीत वनरक्षक प्रशिक्षणार्थी **सत्र क्र**. 63 यांच्या **सहा महिने** कालावधी प्रशिक्षणाला सुरुवात झाली असुन सदर प्रशिक्षणार्थींचा प्रथम सत्र अभ्यासक्रम खाली दिलेल्या तक्ता प्रमाणे सुरु करण्यात आले.

| सरळ सेवा प्रविष्ठ अप्रशिक्षीत वनरक्षक प्रशिक्षण सत्र क्र. 63 (कालावधी दि. 01/10/2025 ते 29/03/2026) | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र** | **विषय** | **व्याख्याते** | **विषयनिहाय माहिती** |
| 01 | **कवायत व खेळ** | श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.<br>श्री. महादेव धुर्वे ( कत्रांटी क.शि. व.प्र.सं.चिखलदरा )<br>श्री. नितीन बघाये ( कत्रांटी क.शि. व.प्र.सं.चिखलदरा ) | **कवायत व खेळ** (Drill and Sports)<br>प्रशिक्षणार्थ्यांना शारीरिक क्षमतेसाठी दैनिक कवायत व विविध खेळांचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये पथसंचलन, व्यायाम, लष्करी शिस्त, तसेच फुटबॉल, व्हॉलीबॉल इत्यादी खेळांचा समावेश होता.<br>**उद्देश:**<br>शारीरिक तंदुरुस्ती, टीमवर्क, व शिस्त यांचे महत्त्व पटवून देणे. |
| 02 | **वनस्पतीशास्त्र** | डॉ. कोकाटे मॅडम, सिपना कॉलेज, चिखलदरा. | **उद्देश:** वनस्पतींच्या रचनेचा, वाढीचा, वर्गीकरणाचा आणि त्यांच्या पर्यावरणाशी असलेल्या संबंधांचा अभ्यास करणे.<br>**मुख्य घटक:**<br>वनस्पतींची रचना (मूळ, खोड, पाने, फुले, बीज).<br>प्रकाशसंश्लेषण, श्वसन, पोषण प्रक्रिया.<br>वनस्पतींचे वर्गीकरण , वृक्ष, झुडपे, गवत इ.<br>वृक्षांची ओळख (Tree Identification) आणि स्थानिक जातींचे महत्व.<br>बीज संकलन, अंकुरण, रोपवाटिका व्यवस्थापन. |
| 03 | **वनसंवर्धन शास्त्र (भाग-01)** | श्री. एस.बी. धर्माधिकारी, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश:** वन वृक्षांचे संवर्धन, वाढ, आणि पुनरुत्पादन यांचा अभ्यास.<br>**मुख्य घटक:**<br>वन संवर्धन परिचय, वृक्षांची वृध्दी, वनांच्या वाढीवर परिणाम करणारे घटक, वनस्पतींचे अनुक्रमण, राज्यातील महत्वाचे वनांचे प्रकार, वृक्षांचे वर्गीकरण, जोपासना, विरळणी. |
| 04 | **वृक्षांचे वनसंवर्धन शास्त्र (भाग-02)** | श्री. आर.बी.गिरी, वनपरिक्षेत्र अधिकारी (से.नि.) रा. परतवाडा. | **उद्देश:** आर्थिक मूल्याच्या प्रजातींचे उत्पादन वाढवणे, प्रति युनिट वन उत्पादन वाढवणे, दर्जेदार लाकडाचे उत्पादन घेणे, दोन कापणीचे चक्रातील वर्षे कमी करणे, रिकाम्या भागात मानवनिर्मित जंगलांची निर्मीती करणे, मानवनिर्मित रोपवनांची निर्मिती करणे, विदेशी प्रजातीची वनामध्ये लागवड करणे.<br>**मुख्य घटक:**<br>सिल्विकल्चर वर्ण / गुणधर्म, निवडक वन वृक्ष प्रजातींचे वनसंवर्धन, नवीन वन निर्मिती आणि कापणीच्या पध्दती, निम्न वन प्रणाली. |
| 05 | **जैव विविधता व्यवस्थापन** | श्री. एस.बी. धर्माधिकारी, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश:** पृथ्वीवरील विविध जीवसृष्टीचे संरक्षण व संतुलन राखणे.<br>**मुख्य घटक:** जैवविविधतेची संकल्पना आणि स्तर. आनुवंशिक, प्रजातीगत, परिसंस्थात्मक.<br>**जैवविविधतेचे महत्त्व:** पर्यावरणीय, आर्थिक, औषधी, सांस्कृतिक. स्थानिक व लुप्तप्राय प्रजातींचे संवर्धन.<br>**संरक्षित क्षेत्रे** - राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, राखीव क्षेत्रे. |
| 06 | **जल व मृद संधारण** | श्री. अनिल लोखंडे, खाजगी अभियंता, रा.परतवाडा. | **उद्देश:** पाणी आणि मातीचे संवर्धन करून वन व कृषी उत्पादन टिकवून ठेवणे.<br>**व्याख्या** : उपलब्ध जलसंपत्तीचे संरक्षण, संवर्धन व विकास आणि तिचे उपयुक्ततापूर्ण व फायदेशीर व्यवस्थापन करणे. |
| 07 | **वनकायदे** | श्री. एस.एम. जगताप, वि.व.अ. (से.नि.) | **उद्देश:** वनसंरक्षण, वनव्यवस्थापन व वनातील गुन्ह्यांचे नियंत्रण यासाठी कायदे समजणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **मुख्य घटक:** भारतीय वन अधिनियम, 1927 (Indian Forest Act). वन्यजीव संरक्षण अधिनियम, 1972 (Wildlife Protection Act). वनसंवर्धन अधिनियम, 1980 (Forest Conservation Act). अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वनवासी (अधिकार मान्यता) अधिनियम, 2006 (FRA). वनगुन्हे ओळखणे, पंचनामा, जप्ती, न्यायालयीन कार्यवाहीची मूलभूत माहिती. |
| 08 | **वन अभियांत्रिकी** | श्री. एस.एम. सुरजुसे, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश** : वनसंपत्तीच्या योग्य व्यवस्थापनासाठी अभियांत्रिकी तत्वांचा वापर करणे. वनउत्पादनांची सुरक्षित, कार्यक्षम व शाश्वत वाहतूक सुनिश्चित करणे.<br>**मुख्य घटक** : वन रस्ते, पूल, जलसंधारण रचना उभारणी, मृद व जलसंरक्षण अभियांत्रिकी, लाकूड उत्खनन व वाहतूक तंत्र,यांत्रिक साधनांचा वापर व देखभाल |
| 09 | **व्यवस्थापकीय कौशल्य** | श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | **उद्देश** : वनक्षेत्रातील कामकाज प्रभावी, समन्वित व नियोजित रीतीने पार पाडणे. कार्यसंघ अधिक सक्षम व परिणामकारक बनवणे.<br>**मुख्य घटक**: नियोजन, संघटन, मार्गदर्शन व नियंत्रण नेतृत्व, निर्णयक्षमता व समस्या निराकरण मनुष्यबळ व्यवस्थापन व संवादकौशल्य. |
| 10 | **कुरण विकास व्यवस्थापन** | प्रा. जी. डी. मुरतकर, सिपना कॉलेज, चिखलदरा. | **उद्देश** : पशुधन व वन्यजीवांसाठी शाश्वत चारापूरवठा उपलब्ध करणे. कुरणांची माती, पाणी व जैवविविधता सुधारणा करणे.<br>**मुख्य घटक**: कुरणांचे सर्वेक्षण, मृद व हवामान मूल्यांकन गवत लागवड, सुधारणा व व्यवस्थापन चाराप्रकार, वन्यजीवांसाठी चराईक्षेत्र विकास. |
| 11 | **वन्यजीव व्यवस्थापन** | श्री. एस.एम. सुरजुसे, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश** : वन्यजीवांचे संरक्षण, संवर्धन व त्यांचा नैसर्गिक अधिवास टिकवणे. जैवविविधता संतुलित ठेवणे.<br>**मुख्य घटक**: अधिवास संरक्षण, परिसंस्था संवर्धनवन्यजीव गणना, निरीक्षण व संशोधनमानव-वन्यजीव संघर्ष नियंत्रणसंरक्षित क्षेत्रांचे नियोजन. |
| 12 | **वनमिती** | श्री. एस.एन.गुल्हाने, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश** : जंगलातील लाकूडसंपत्तीचे अचूक मूल्यांकन करणे. कार्ययोजना व वनसंपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक माहिती उपलब्ध करणे.<br>**मुख्य घटक**: वृक्ष मापन पद्धती (उंची, व्यास, घनफळ) वनक्षेत्र सर्वेक्षण तंत्रनमुना सर्वेक्षण व डेटा विश्लेषण. |
| 13 | **मृदशास्त्र** | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | **उद्देश** : खडक व माती, पृथ्वीचे आवरण, अग्निजन्य, जलयजन्य व रुपांतरित खडक व त्यांचे विविध प्रकार, खडक व खनिजांचे विघटन.<br>**मुख्य घटक**: मातीची उत्पत्ती, रचना, गुणधर्ममृद प्रकार, सुपीकता, पोषकतत्त्वेमृद अपरदन व जलसंरक्षण तत्वे, भौतिक व रासायनिक जैविक कारके व प्रक्रिया, जमिनीचा पोत व जमिनीची घडण, आम्ल-विम्ल निर्देशांक, महत्वाचे मातीचे प्रकार व गुणधर्म. |
| 14 | **भुमि अभिलेख** | श्री. हेमंत शेवाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, पाल. | **उद्देश** : वनक्षेत्राची स्पष्ट, संगणकीकृत व अचूक नोंद राखणे. सीमावाद टाळणे व जमीन व्यवस्थापन सुलभ करणे.<br>**मुख्य घटक**: नकाशे, भू-मापन, सातबारा व इतर अभिलेखभू-सीमा निर्धारण, दुरुस्ती व डिजिटल नोंद GIS, GPS वापर. |

| | | | |
|---|---|---|---|
| 15 | **पुनरुत्पादन पध्दती ( वनसंवर्धन शास्त्र भाग**-3) | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | **उद्देश**: जंगलांचा सातत्यपूर्ण वाढीचा वेग टिकवून ठेवणे. हरितक्षेत्र वाढवणे व लाकूडसंपत्तीची स्थिर उपलब्धता सुनिश्चित करणे.<br>**मुख्य घटक**: प्राकृतिक पुनरुत्पादन (बी उगवण, अंकुरोत्पादन) कृत्रिम पुनरुत्पादन (लागवड, बियाणे पेरणी, रोपवाटिका) कापणी पद्धती, पुनरुत्पादन निरीक्षण, वनांची पुनरुत्पती, नैसर्गिक पुनरुत्पत्ती, मियावाकी वृक्षारोपन पध्दती. |






वरील सर्व विषय वनरक्षक प्रशिक्षणाचा मूलभूत पाया आहेत. या अभ्यासक्रमामुळे प्रशिक्षणार्थीला वनव्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि कायदेशीर चौकटीत राहून वनसेवा कार्यक्षमतेने पार पाडण्याची क्षमता प्राप्त होते.

03. **वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र.** 63 **यांना** Forest & Forestry **या विषयावर मार्गदर्शन**.

**( अभ्यासक्रमा व्यतिरिक्त )**

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थी यांना **श्री. व्ही. के. मोहन, मुख्य वनसंरक्षक (से.नि.)** यांनी प्रशिक्षणार्थींना **Forest & Forestry** या विषयावर मार्गदर्शन केले.

**सदर प्रशिक्षणाचे खालील प्रमाणे मुद्दे आहे.**

**1) जंगलातून मिळणारे लाभ (What the Forest Provides)**

**अ) थेट लाभ (Direct Benefits)**

- लाकूड, इंधन लाकूड, बांबू.
- गवत, चारा.
- गौण वनउपज (NTFP): तेंदूपत्ता, मोहाफुले, मध, लाख, औषधी वनस्पती.
- स्थानिक लोकांना रोजगार.
- शासनाला महसूल.
- ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार.

***जंगल हे उत्पन्नाचे साधन आहे, फक्त संरक्षणाची जबाबदारी नाही.***

**ब) अप्रत्यक्ष लाभ (Indirect Benefits)**

- पावसाचे पाणी धरून ठेवणे व भूजल पुनर्भरण.
- माती धूप रोखणे.
- हवामान संतुलन व कार्बन शोषण.
- जैवविविधतेचे संवर्धन.
- पूर व दुष्काळ नियंत्रण.
- पर्यटन व पर्यावरणीय शिक्षण.

***हे लाभ दिसत नाहीत, पण त्यांची किंमत फार मोठी आहे.***

**2) बीट गार्ड आपल्या बीटमधून आर्थिकदृष्ट्या काय योगदान देऊ शकतो. (What can a beat guard contribute financially while managing his beat)**

- जंगलाचे प्रभावी संरक्षण → नुकसान कमी → महसूल वाढ.
- अवैध तोड व अतिक्रमण रोखणे.
- जंगलातील आगी प्रतिबंध.
- गौण वनउपजाचे शास्त्रीय संकलन.
- बांबू, गवत, चाऱ्याचे नियोजन.
- रोपवाटिका व लागवड यशस्वी करणे.
- संयुक्त वन व्यवस्थापनात गावकऱ्यांना सहभागी करणे.

***चांगला बीट गार्ड म्हणजे चालता-फिरता संपत्ती रक्षक.***

### 3) वृक्षलागवडीचे प्रत्यक्ष फायदे (Real Benefits of Tree Plantation)

- योग्य ठिकाणी योग्य प्रजातींची लागवड.
- स्थानिक व देशी वृक्षांना प्राधान्य.
- लागवडीपेक्षा जिवंत राहण्याचे प्रमाण महत्त्वाचे.
- मृदा व जलसंधारण.
- फळ, चारा, इंधन देणारे वृक्ष.
- दीर्घकालीन पर्यावरणीय सुधारणा.
- हवामान बदलावर नियंत्रण.

***लागवड आकड्यासाठी नव्हे, तर भविष्यासाठी असावी.***

### 4) वनअधिकारी सामाजिक व आर्थिक लाभ कसे वाढवू शकतात. (what a forest officer can do for maximizing social and financial benefits from any forest area)

- स्थानिक लोकांशी विश्वासाचे नाते निर्माण करणे.
- संयुक्त वन व्यवस्थापन मजबूत करणे.
- महिला बचत गट व स्वयं-सहायता गटांना प्रोत्साहन.
- गौण वनउपज प्रक्रिया व मूल्यवर्धन.
- इको-टुरिझम विकसित करणे.
- इतर विभागांशी समन्वय (CSR, ग्रामविकास).
- कर्मचाऱ्यांना प्रेरणा व प्रशिक्षण.

***वनअधिकारी म्हणजे फक्त प्रशासक नव्हे, तर नेतृत्व करणारा मार्गदर्शक.***

### 5) संयुक्त वन व्यवस्थापनात महिला वनअधिकाऱ्यांची भूमिका. (Role of lady forest officers in joint forest management)

- महिलांशी सहज संवाद व विश्वास.
- महिला बचत गटांचे सशक्तीकरण.
- वनसंरक्षणात महिलांचा सहभाग वाढवणे.
- घरगुती अर्थकारण व उपजीविका सुधारणा.
- वाद निवारणात संयमी भूमिका.
- सामाजिक बदल घडवून आणणे.

***महिला वनअधिकारी म्हणजे व्यवस्थापनातील संवेदनशील शक्ती.***

## 04. **वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र.** 63 **यांना** Wildlife Forensic Sample Collection and Dispatch **या विषयावर प्रशिक्षण** ( **दि.** 03/10/2025 )



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षीत वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांना दि. 03/10/2025 रोजी **श्री. डॉ. सुजित कोलंगथ, विषयतज्ञ, गोरेवाडा प्रकल्प नागपूर,** यांनी **Wildlife Forensic Sample Collection and Dispatch** या विषयावर **Online Video Conference** द्वारे प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण दिले.

**प्रशिक्षणाचे मुख्य विषय**:-

1. **Crime Scene Management**:
   गुन्हा स्थळ सुरक्षित ठेवणे (Cordon off ). पुरावे दूषित होऊ नयेत यासाठी उपाययोजना. फोटो व व्हिडिओ दस्तऐवजीकरण.
2. **Evidence Collection**:
   हाडे, दात, केस, रक्त, मांस, चामडे, पिसे, विष्ठा इ. नमुने संकलनाची पध्दत. योग्य साधने (Gloves, Forceps, Vials, Envelopes) वापरणे. जैविक (Biological) व अजैविक (Non-Biological) पुराव्यांची विभागणी.
3. **Preservation & Packaging**:
   प्रत्येक नमुना स्वतंत्रपणे पॅक करणे. आवश्यकतेनुसार थंड तापमानात ठेवणे (Refrigeration). लेबलिंग: केस क्रमांक, तारीख, ठिकाण, संकलनकर्ता इ. माहिती लिहिणे.
4. **Documentation**:
   नमुना संकलन पॅन, पंचनामा व फॉरेन्सिक लेबलिंग फॉर्म भरणे. Chain of Custody फॉर्ममध्ये सर्व हस्तांतरणांची नोंद ठेवणे.
5. **Dispatch to Laboratory**:
   अधिकृत मार्गाने नमुने प्रयोगशाळेकडे पाठविणे. सीलिंग व सील तपासणी प्रक्रिया. प्राप्तीची नोंद ठेवणे.

या प्रशिक्षणातून नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षकांना वन्यजीव गुन्हा तपासामध्ये फॉरेन्सिक पुरावे संकलनाची वैज्ञानिक पध्दत शिकता आली. योग्य संकलन व प्रशिक्षणामुळे तपासाची गुणवत्ता सुधारेल आणि न्यायालयीन प्रक्रियेत खात्रीशीर पुरावे सादर करता येतील.

**05. सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे संस्थेतील क्षेत्रीय कामे.**

**( झाडांना आळे करणे )**



**( वसतीगृहाचा परिसर स्वच्छ करणे )**





06. सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ.





## प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ





नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक यांचे 6 महिने कालावधी प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींना विविध व्यायामाचे प्रकार शिकवण्यात येतात. त्यामध्ये प्रशिक्षणार्थ्यांकडुन Front Roll, Backward Roll, Crocodile Walk, Crawling, Climbing, Hurdles Jumping या सारख्या विविध व्यायाम प्रकारांबाबत माहिती देण्यात आली. तसेच विविध तांत्रिक बाबी समजावुन प्रात्यक्षिक करुन घेण्यात आले. यामध्ये प्रशिक्षणार्थ्यांमध्ये उत्साह, आत्मविश्वास, संघ भावना तसेच सहकार्य वाढल्याचे प्रकर्षाने जाणवले.

सदर प्रशिक्षणार्थींना एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व महादेव धुर्वे, कंत्राटी सहा. कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा आणि नितीन बघाये, कत्रांटी सहा. कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांनी योग्य ते मार्गदर्शन केले.

## प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ





नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक यांचे 6 महिने कालावधी प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींचे संध्याकाळच्या खेळ सेशन मध्ये प्रशिक्षणार्थींची रनिंग नियमीतपणे घेण्यात येते. कधी कधी प्रशिक्षणार्थींचा महत्वपूर्ण आणि शारीरिक तसेच मानसिक तयारी तपासणारा Carry the Person हा (Recreational) गेम घेण्यात येतात. या गेममध्ये 5 जणांची टीम बनवुन एका जणाला जणु काही तो injured आहे अस समजुन आणि हाताला व पायाला धरुन उचलून घेऊन नेण्यात येते. Injury झालेल्या व्यक्तींला योग्य पध्दतीने कस हलवावं, संवेदनशीलता कशी दाखवावी आणि सर्वात महत्वाचं म्हणजे योग्य टीमवर्क म्हणजे नेमक काय हे समजते.

# प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ.







## 07. **महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती.** ( दि. 02/10/2025 )









वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 02/10/2025 रोजी महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांची जयंती **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा सन्मान करण्याचा हा प्रसंग अत्यंत महत्वाचा आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सत्य, अहिंसा, स्वावलंबन आणि समाजकल्याण यांचे विचार मांडून देशाच्या स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा दिली.

तर भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी जय जवान जय किसान या घोषवाक्याद्वारे परिश्रम, शिस्त आणि देशसेवेचे महत्व अधोरेखित केले. त्यांच्या आदर्शांचा आजच्या पिढीने अंगीकार करुन प्रामाणिक, जबाबदार व राष्ट्रहितदायी आचरण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

## 08. **महर्षी वाल्मिकी यांची जयंती**. ( **दि.** 07/10/2025 )




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 07/10/2025 रोजी **महर्षी वाल्मिकी** यांची जयंती **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

महर्षी वाल्मिकी जयंती हा महान संस्कृत कवी आणि रामायण ग्रंथाचे रचयिता महर्षी वाल्मिकी यांच्या स्मरणार्थ साजरा केला जाणारा दिवस आहे. वाल्मिकींनी समाजात सत्य, धर्म आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांनी रामायणाद्वारे आदर्श जीवनाचे तत्त्वज्ञान मांडले. त्यांच्या कार्यामुळे भारतीय संस्कृती व साहित्य समृध्द झाले.

या दिवशी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, वाचन स्पर्धा व उपक्रम आयोजित केले जातात. महर्षी वाल्मिकींच्या विचारांचे अनुकरण करुन समाजात नैतिकता, सदाचार आणि समानतेचा प्रसार करणे हेच या दिनाचे खरे महत्त्व आहे.

## 09. **रक्तदान शिबीर**. ( **दि**. 07/10/2025 )






दिनांक 07/10/2025 रोजी गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा व वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व शासकीय ग्रामीण रुग्णालय, चिखलदरा यांच्या संयुक्त विद्यमाने **वन्यजीव सप्ताह** 2025 निमित्त वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे भव्य **रक्तदान शिबीराचे** आयोजन करण्यात आले.

10. M-STrIPES **हाताळणी प्रशिक्षण** ( दि. 14/10/2025 )



दिनांक 14/10/2025 रोजी वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा व मेळघाट वन्यजीव विभाग, परतवाडा व वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या संयुक्त विद्यामाने M-STrIPES हाताळणी विषयक विशेष प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. वन्यजीव संरक्षण व गस्त व्यवस्थापनामध्ये M-STrIPES हा महत्वाचा तांत्रिक घटक असल्याने हे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरले.

**प्रशिक्षणाचे उद्दिष्टे**:

1. वन्यजीव संरक्षणामध्ये M-STrIPES चा कार्यक्षम व सुरक्षित वापर शिकविणे.
2. क्षेत्रातील वनकर्मचारी व अधिकाऱ्यांची तांत्रिक क्षमता वाढवणे.
3. संयुक्त विभागांमध्ये समन्वय, अनुभव देवाणघेवाण आणि कार्यपध्दतींचे एकरुपीकरण घडविणे.
4. प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष क्षेत्रातील आधुनिक साधनांची ओळख करुन देणे.

**प्रशिक्षणातील सहभागी**:

- गुगामल आणि मेलघाट या दोन्ही वन्यजीव विभागांतील **वन कर्मचारी व अधिकारी** मोठया संखेने उपस्थित होते.
- वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेल्या विविध प्रशिक्षण अभ्यासक्रमांतील **प्रशिक्षणार्थी** देखील सहभागी झाले होते.
- या विविध स्तरांतील सहभागामुळे प्रशिक्षण प्रक्रियेत समृध्द चर्चा आणि अनुभवांची देवाणघेवाण झाली.

**कार्यपध्दती व प्रशिक्षणाचे स्वरूप**:

1. M-STrIPES **प्रणालीची ओळख**: यंत्रणेचे तांत्रिक घटक, कार्यपध्दती, वापराचे नियम यांचे सादरीकरण.
2. **प्रात्यक्षिक सत्र**: M-STrIPES चा वापर करुन गस्त, नोंदवही, डेटा गोळा करणे, तसेच क्षेत्रातील आपात्कालीन परिस्थितींमध्ये त्याचा उपयोग कसा करावा याचे मार्गदर्शन.
3. **कौशल्यविकास**: सहभागींकडून M-STrIPES प्रत्यक्ष हाताळणी करुन घेण्यात आली.
4. **प्रश्नोत्तर सत्र**: सहभागींच्या शंकांचे निरसन करुन संबंधित सूचनांची देवाणघेवाण.

**निरीक्षणे**:

- वनकर्मचारी आणि प्रशिक्षणार्थी दोघांनीही M-STrIPES चा उपयोग सहजपणे आत्मसात केल्याचे दिसून आले.
- विभागांमधील संयुक्त प्रशिक्षणामुळे कामकाजात समन्वय वाढण्यास मदत होईल.
- सहभागींच्या प्रतिसादावरुन प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त, व्यावहारीक आणि अद्ययावत असल्याचे स्पष्ट झाले.
- आधुनिक तंत्रज्ञानाचा वन्यजीव व्यवस्थापनात कसा प्रभावी उपयोग होऊ शकतो याची सहभागींकडे ठोस समज निर्माण झाली.

**निष्कर्ष**:

गुगामल आणि मेलघाट वन्यजीव विभागांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित M-STrIPES हाताळणी प्रशिक्षण अत्यंत यशस्वी ठरले. अधिकारी, वनकर्मचारी आणि प्रशिक्षणार्थी यांनी तांत्रिक साधनांच्या वापराबाबत आवश्यक ज्ञान, कौशल्य आणि आत्मविश्वास प्राप्त केला. क्षेत्रातील गस्त कार्य, आपत्ती व्यवस्थापन आणि वन्यजीव संरक्षणातील अचूक डेटा संकलन या सर्व बाबींमध्ये M-STrIPES चा प्रभावी उपयोग कसा करता येतो हे स्पष्ट झाले. अशा प्रकारचे संयुक्त प्रशिक्षण कार्यक्रम भविष्यातही सातत्याने आयोजित केल्यास वन विभागाच्या कार्यक्षमतेत आणि समन्वयात लक्षणीय वाढ होईल.

11. **डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती**. ( दि. 15/10/2025 )




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 15/10/2025 रोजी **डॉ. ए. पी. जे.अब्दुल कलाम** यांची जयंती **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे जीवन हे देशप्रेम, विज्ञाननिष्ठा आणि नीतिमूल्यांचा आदर्श नमुना आहे. त्यांच्या कार्यामुळे भारताने विज्ञान, तंत्रज्ञान आणि संरक्षण क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली. “जनतेचे राष्ट्रपती” म्हणून त्यांनी तरुणांना स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची प्रेरणा दिली.

त्यांच्या विचारसरणीमुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचेतना आणि आत्मविश्वास निर्माण झाला. आजच्या पिढीने त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करुन समाजाच्या विकासासाठी कार्य केले पाहिजे. डॉ. कलाम यांची जयंती ही वैज्ञानिक दृष्टिकोन आणि राष्ट्रसेवेच्या मूल्यांची पुन्हा जाणीव करुन देणारी प्रेरणादायी संधी आहे.

## 12. **मा. उप वनसंरक्षक ( शिक्षण व प्रशिक्षण ) म.रा. पुणे यांचा दौरा.**
## **( दि. 28/10/2025 ते 29/10/2025 )**

**मा. श्री. जयरामेगौडा आर, उप वनसंरक्षक, ( शिक्षण व प्रशिक्षण ) ( भा. व. से. ) म.रा. पुणे** यांनी दिनांक 28/10/2025 व 29/10/2025 रोजी वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे भेट दिली. यावेळी वनरक्षक सत्र क्र. 63 कडून महोदयांना मानवंदना ( Guard of Honour ) देण्यात आला. त्यानंतर **मा. उप वनसंरक्षक, ( शिक्षण व प्रशिक्षण ) म.रा. पुणे** यांनी अप्रशिक्षित वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थी यांच्याशी संवाद साधून प्रशिक्षणार्थींना गणवेश आणि शिस्त याबाबत महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. प्रत्येक वनरक्षकाने दररोज पूर्ण गणवेशात उपस्थित राहावे. ओळखपत्र नेहमी परिधान करणे बंधनकारक आहे. गणवेश हे वनसेवेचे प्रतीक आहे. त्याचा आदर राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, वेळेवर उपस्थित राहणे आवश्यक आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आदेश काटेकोरपणे पाळणे अपेक्षित आहे.

त्यानंतर माननीय महोदयांनी प्रशिक्षणार्थी यांच्या अडचणी जाणून घेऊन त्यावर आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांना सूचना देऊन आवश्यक त्या साहित्य खरेदी प्रस्ताव, नवीन व दुरुस्ती कामे प्रस्ताव सादर करणेबाबत सूचित केले.

त्यानंतर माननीय महोदयांनी **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व कु. मनीषा आर. मगरदे, उपसंचालक (2), वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांचे समवेत संपूर्ण संस्थेची पाहणी केली व आवश्यक त्या सूचना दिल्या.

त्यानंतर तामिळनाडू येथील सत्यमंगलम STF च्या धर्तीवर वन विभागातील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना JUNGLE SURVIVAL AND COMBAT TACTIS बाबत पायाभूत प्रशिक्षण देणेकरीता एक सर्वसमावेशक प्रशिक्षण मॉडेल तयार करणेबाबत सूचना महोदयांनी दिल्या.

## मा. उप वनसंरक्षक ( शिक्षण व प्रशिक्षण ) म.रा. पुणे यांचा दौरा.
## ( दि. 28/10/2025 ते 29/10/2025 )







## मा. उप वनसंरक्षक ( शिक्षण व प्रशिक्षण ) म.रा. पुणे यांचा दौरा.
## ( दि. 28/10/2025 ते 29/10/2025 )








## मा. उप वनसंरक्षक ( शिक्षण व प्रशिक्षण ) म.रा. पुणे यांचा दौरा.
## ( दि. 28/10/2025 ते 29/10/2025 )

















## 13. **सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व इंदिरा गांधी पुण्यतिथी**.
## ( दि. 31/10/2025 )




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 31/10/2025 रोजी **सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती संचालक**, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. व यासोबतच नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांनी **सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व इंदिरा गांधी पुण्यतिथी** साजरी केली.

सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि श्रीमती इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी या दोन्ही दिवसांना राष्ट्रीय इतिहासात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. राष्ट्रीय एकात्मतेचे दृढ प्रतिक म्हणून ओळखले जाणारे सरदार पटेल यांनी देशाच्या संस्थात्मक बांधणीसाठी केलेल्या कार्यामुळे भारताच्या राज्यव्यवस्थेला भक्कम पाया लाभला. त्यांच्या दूरदृष्टी, साहस आणि संघटनकौशल्यामुळे भारतीय प्रजासत्ताकाला स्थैर्याची नवी दिशा मिळाली.

श्रीमती इंदिरा गांधी या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून त्यांच्या धाडसी नेतृत्व, दृढ निश्चय आणि राष्ट्रहितासाठीच्या कटिबद्धतेमुळे प्रसिद्ध राहिल्या. देशाच्या सुरक्षेसाठी, विकासासाठी आणि सामाजिक न्यायासाठी त्यांनी घेतलेल्या निर्णयांमुळे भारताच्या प्रगतीला नवसंजीवनी मिळाली.

या दोन्ही महान नेत्यांचे कार्य, विचारसरणी आणि देशभक्तीचे मूल्य आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांच्या स्मृतिदिनांचे पालन करताना राष्ट्रीय ऐक्य, सामाजिक सौहार्द, जबाबदारीची जाणीव आणि लोकशाही मूल्यांचे संवर्धन यांना नवी चालना मिळते.

म्हणूनच, या दिवसांचे स्मरण हे केवळ औपचारिकता नसून राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत आत्मपरीक्षण आणि प्रेरणा घेण्याची संधी आहे. देशाच्या प्रगतीसाठी त्यांच्या कार्याचा आदर्श ठेवून सामाजिक आणि राष्ट्रीय बांधिलकी दृढ करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

## 14. वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे राज्य योजने अंतर्गत लिपिक / लेखापाल / वनरक्षक / वनपाल यांचे 5 व 3 दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम (माहे आक्टोबर 2025)

| अ. क्र | सत्र क्र. व दिनांक | संवर्ग | विषय | व्याख्याते | हजर प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 |
| 01 | **सत्र क्र. 11 दि. 06/10/25 ते 10/10/25** | **लिपिक / लेखापाल** | **विषय: महाराष्ट्र नागरी सेवा(वेतन) नियम 1981, वेतन निश्चिती व सेवानिवृत्ती विषयक लाभ.** | | 20 |
| | | | 1.महाराष्ट्र नागरी सेवा नियम (वेतन) 1981 (मुळ नियम)-1 व 2.<br>2. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सुधारीत वेतन) नियम 2019 (7 वेतन आयोग ) (प्रात्यक्षिक)<br>3. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सुधारीत वेतन) नियम 2009 (6 वेतन आयोग ) (प्रात्यक्षिक)<br>4. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सुधारीत वेतन) नियम 1998 (5 वेतन आयोग ) (प्रात्यक्षिक)<br>5. वेतनिका (online pay fixation practical)<br>6. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सेवानिवृत्ती वेतन) (NPS/UPS-1) शंका निरासन. | श्री. ओमप्रकाश जाधव.<br>सहा. लेखा अधिकारी<br>रा. अमरावती. | |
| | | | 7. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सेवानिवृत्ती वेतन)(मुळनियम-1,2).<br>8. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सेवानिवृत्ती वेतन विषयक प्रकरणे तयार करणे)<br>9. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सेवानिवृत्ती वेतन) (प्रात्यक्षिक-1,2)<br>10. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सेवानिवृत्ती विषयक लाभ-1,2) (शंका व समाधान)-1 | श्री. विजय डहाळे,<br>सहा. लेखा अधिकारी<br>रा. अमरावती. | |
| 02 | **सत्र क्र. 12 दि. 06/10/25 ते 08/10/25** | **वनरक्षक / वनपाल** | **विषय: वन व वन्यजीव विषयक कायदे व त्यांची अंमलबजावणी.** | श्री. नरेंद्र चांदेवार,<br>वि.व.अधिकारी,<br>नागपूर. | 25 |
| | | | 1. Wildlife Protection Act.1972 व सुधारणा 2022.<br>2. BNSS,BSA, BNS मधील आवश्यक तरतुदी.<br>3. भारतीय वन अधिनियम 1927 व जन विश्वास कायदा 2023.<br>4. महाराष्ट्र वन नियमावली 2014.<br>5. F.R.A. तरतुदी.<br>6. वनगुन्हे शोध तपास व कार्यपध्दती. (प्रात्यक्षिक व शंका निरसन) | | |
| 03 | **सत्र क्र. 13 दि. 09/10/25 ते 11/10/25** | **वनरक्षक / वनपाल** | **विषय: कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा अधिनियम 2013.** | श्री. प्रा. राजेश पाटील,<br>रा. अमळनेर. | 20 |
| | | | 1. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा अधिनियम 2013 ओळख व मुलभुत माहिती आणि कायदा तरतुदी (प्रात्यक्षिक) | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 04 | **सत्र क्र.** 14 **दि.** 13/10/25 **ते** 17/10/25 | **लिपिक / लेखापाल वनरक्षक / वनपाल** | **विषय: व्यक्तीमत्त्व विकास व ताणतणाव व्यवस्थापन व** NLP<br>1. व्यक्तिमत्वाचा सार्वांगीण परिचय.<br>2. आत्मविश्वास वाढविणे मुलभूत माहिती.<br>3. प्रभावि संभाषण मुलभूत माहिती.<br>4. भावनांवर नियंत्रण साध्य करणे.<br>5. उदिष्ट साध्य करणे.<br>6. शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारणे.<br>7. सकारात्मक दृष्टीकोन.<br>8. निर्णय क्षमता सुधारणे. (शंका निरसन, प्रात्यक्षिक) | श्री. एस.एस. आकेवार, क.शि, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | 27 |
| | | | 9. संवाद कौशल्य व्यवस्थापन.<br>10. ताण तणाव व्यवस्थापन.<br>11. भावनिक बुध्दिमत्ता.<br>12. व्यक्तिमत्त्व विकास.<br>13. सकारात्मक दृष्टिकोन. (शंका निरसन) | श्री. रागिब अहमद, तज्ञ व्यक्तीमत्त्व विकास. | |
| 05 | **सत्र क्र.** 15 **दि.** 13/10/25 **ते** 15/10/25 | **वनरक्षक / वनपाल** | **विषय: वन अभियांत्रिकी.**<br>1. वनविभागातील विविध ईमारती मूलभूत माहिती.<br>2. नविन ईमारतीचे बांधकाम अंदाजपत्रक तयार करणे.<br>3. नविन ईमारतीचे बांधकाम अंदाजपत्रकातील विविध बाबी. | श्री. अनिल लोखंडे, खाजगी अभियंता. रा. परतवाडा. | 27 |
| | | | 4. ईमारत बांधकाम साहित्य माहिती.<br>5. वनविभागातील विविध ईमारत बांधकामाबाबत माहिती.<br>6. ईमारती देखभाल व दुरुस्ती.<br>7. मोजमाप पध्दती.<br>8. मोजमाप पुस्तिका तयार करणे.<br>9. बांधकाम प्रमाणके तयार करणे.<br>10. क्षेत्रिय दौरा. | श्री. एस.एम. सुरजुसे, सहाय्यक वनसंरक्षक, (से.नि) | |
| 06 | **सत्र क्र.** 16 **दि.** 16/10/25 **ते** 18/10/25 | **लिपिक / लेखापाल वनरक्षक / वनपाल** | **विषय:** NLP (Neuro Linguistic Programme)<br>1. व्यक्तिमत्त्वाचा सार्वांगीण विकास परिचय.<br>2. आत्मविश्वास वाढविणे मुलभूत माहिती.<br>3. प्रभावि संभाषण मुलभूत माहिती.<br>4. भावनांवर नियंत्रण साध्य करणे.<br>5. उद्दिष्ट साध्य करणे.<br>6. शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारणे.<br>7. सकारात्मक दृष्टीकोन.<br>8. निर्णय क्षमता सुधारणे.<br>9. (प्रात्यक्षिक , शंका निरसन) | श्री. एस.एस. आकेवार, क.शि, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | 18 |
| | **एकुण प्रशिक्षणार्थी** | | | | 137 |








प्रशिक्षणार्थींचे 05 दिवसीय प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.

**वनरक्षक, वनपाल प्रशिक्षण सत्र क्र. 12 ( दि. 06/10/2025 ते 08/10/2025 )**
**विषय: वन व वन्यजीव विषयक कायदे व त्यांची अंमलबजावणी.**









प्रशिक्षणार्थींचे 03 दिवसीय प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.










प्रशिक्षणार्थींचे 03 दिवसीय प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.

**लिपीक / लेखापाल / वनरक्षक / वनपाल प्रशिक्षण सत्र क्र. 14 ( दि. 13/10/2025 ते 17/10/2025 )**
**विषय: व्यक्तीमत्त्व विकास ताणतणाव व्यवस्थापन व NLP.**










प्रशिक्षणार्थींचे 05 दिवसीय प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.










प्रशिक्षणार्थींचे 03 दिवसीय प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.








प्रशिक्षणार्थींचे 03 दिवसीय प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.

15. **वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या नवीन बोधचिन्हाचे अनावरण तसेच संस्थेची वेबसाईट व युट्युब चॅनेलची निर्मिती.**

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा या संस्थेच्या ओळखीकरिता नविन लोगो ( **बोधचिन्ह** ) तयार करण्यात आले आहे. सदर लोगो संस्थेच्या कार्याशी सुसंगत, आकर्षक व आधुनिक स्वरूपाचा असून संस्थेची स्वतंत्र ओळख निर्माण करणारा आहे.

सदर नविन लोगो कायमस्वरूपी वापरात आणण्यासाठी वरिष्ठ अधिकारी यांची परवानगी मिळावी, यासाठी प्रस्ताव तयार करून त्यांच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. प्रस्तावासोबत लोगोची संकल्पना, त्यामागील अर्थ व वापराचे महत्त्व याची सविस्तर माहिती समाविष्ट करण्यात आलेली आहे.

( **संस्थेचे नवीन लोगो** )







तरी वरिष्ठ अधिकारी यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर लोगो संस्थेच्या सर्व अधिकृत कागदपत्रांवर, फलकांवर तसेच इतर माध्यमांवर वापरण्यात येईल.


वरीलप्रमाणे वन प्रशिक्षण संस्था येथील नविन लोगो तयार करून तो कायम ठेवण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

तसेच, संस्थेचे अधिकृत संकेतस्थळ (Website) तयार करण्याबाबतचा प्रस्ताव यापूर्वी वरिष्ठ अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाला होता.

त्यानुसार संस्थेने सद्यस्थितीत स्वतःचे अधिकृत संकेतस्थळ (https://ftichikhaldara.in) तसेच अधिकृत यूट्यूब चॅनेल (https://youtube.com/@principalmfrc9843?si=VwW1zVHz4Fw7GVnv) तयार केलेले आहे.

सदर माध्यमांद्वारे संस्थेच्या प्रशिक्षण कार्यक्रमांची माहिती, उपक्रम, मार्गदर्शक व्हिडिओ तसेच इतर शासकीय माहिती नागरिकांपर्यंत सुलभरीत्या पोहोचविण्यात येणार आहे.

**( संस्थेचे अधिकृत संकेतस्थळ )**




**( संस्थेचे अधिकृत युट्यूब चॅनेल )**

